स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-१५ जून, २०२३

जळगाव, दि.१५ (प्रतिनिधी )- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांचे शैक्षणिक अंकेक्षण करण्यात आले असून १३३ महाविद्यालयांची श्रेणी विद्यापीठाने संकेतस्थळावर जाहीर केली आहे.

विद्यापीठ कायद्यातील ११७ (१) व (२) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३ चे शैक्षणिक अंकेक्षण करण्यात आले आहे. संलग्नित महाविद्यालयांकडून १८ मुद्यांवर ऑनलाईन माहिती मागविण्यात आली. यामध्ये प्रवेश प्रक्रीया, शिक्षक-कर्मचारी यांची संख्या, ग्रंथालय, संशोधनातील सहभाग, क्रीडा सुविधा व सहभाग, प्राप्त तक्रारींचे निवारण करण्याची पध्दत आदी मुद्यांचा समावेश होता. यावेळी प्रथमच विद्यापीठाने प्रत्यक्ष महाविद्यालयांमध्ये जाऊन अंकेक्षण करण्याऐवजी विद्यापीठाच्या टीमने ऑनलाईन माहितीचा अर्ज तयार करुन महाविद्यालयांना उपलब्ध करुन दिला. त्यामुळे वेळ आणि आर्थिक बचत झाली.

१३३ महाविद्यालयांनी शैक्षणिक अंकेक्षणासाठी माहिती भरली. आलेल्या माहितीचे विश्लेषण करुन अंतर्गत आणि त्यानंतर बाह्य तज्ज्ञ समितीकडून महाविद्यालयांची ए, बी, सी आणि डी अशा चार श्रेणींमध्ये वर्गवारी करण्यात आली. अधिष्ठाता मंडळाने मंजुरी दिल्यानंतर विद्यापीठाने संकेतस्थळावर यादी जाहीर केली आहे.

१३३ महाविद्यालयांपैकी ए श्रेणी मध्ये ३९ महाविद्यालये आहेत. त्यात जळगाव जिल्ह्यातील १९, धुळे जिल्ह्यातील १३ आणि नंदुरबार जिल्ह्यातील ७ महाविद्यालयांचा समावेश आहे. बी श्रेणीत ५५ महाविद्यालयांपैकी जळगाव जिल्ह्यातील २४, धुळे जिल्ह्यातील १९ आणि नंदुरबार जिल्ह्यातील १२ महाविद्यालये आहेत. सी श्रेणीत २७ महाविद्यालयांपैकी जळगाव जिल्ह्यातील १४, धुळे जिल्ह्यातील ९ आणि नंदुरबार जिल्ह्यातील ४ महाविद्यालये आहेत. डी श्रेणीत १२ महाविद्यालयांपैकी जळगाव जिल्ह्यातील ९, धुळे जिल्ह्यातील २ आणि नंदुरबार जिल्ह्यातील एका महाविद्यालयाचा समावेश आहे अशी माहिती नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.राजेश जवळेकर यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी